**सर्वांसाठी पाणी- टंचाई मुक्त महाराष्ट्र- २०१९ अंतर्गत राबविण्यात येणा-या "जलयुक्त शिवार अभियान" कार्यक्रमासाठी जिल्हा वार्षिक योजने मध्ये जलसंधारणाच्या योजनांच्या संबंधित लेखाशीर्षाखालील तरतूदीतून ५०% तरतूद दुरुस्ती व पुनर्जिवनाच्या कामांवर खर्च करण्यास मंजूरीबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

**शासन निर्णय क्रमांकः डिएपी- २०१५/शिकाना /प्र.क्र.१८/ का. १४८१**

हैद्राबाद हाऊस, शिबीर कार्यालय,

नागपूर

तारीख: २२ डिसेंबर,२०१५.

वाचा

१) **शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.जलअ - २०१४/ प्र.क्र. २०३/ जल-७, दि. ७/१२/२०१४**

२) **शासन निर्णय क्रमांकः नियोजन विभाग क्र.डीएपी-२०१५/प्र.क्र.२३/का-१४८१, दि.११.३.२०१५.**

**प्रस्तावना**

शासनाने गेल्या वर्षभरात राज्यातील सर्व जिल्हांमधील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांचा आढावा घेतला असता, प्रत्येक जिल्ह्यात नवीन बंधारे/ चेक डॅम बांधणे या ऐवजी मागील ६० वर्षांच्या कालावधीत बांधण्यात आलेले जुने बंधारे/ सिमेंट नालाबंडींग/ पाझर तलाव तसेच लघुसिंचन तलाव हे दुरुस्त व पुनर्जिवित करणे फायदेशीर व परिणामकारक ठरणार असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी कमी खर्चात स्थानिक पातळीवर पाण्याचा साठा वाढून सिंचन सुविधा तात्काळ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जलसंधारणा करीता अर्थसंकल्पीत केलेल्या सर्व लेखाशीर्षांखालील एकूण तरतूदीपैकी ५०% तरतूद अस्तित्वातील जुने बंधारे/ सिमेंट नालाबंडींग/ पाझर तलाव तसेच लघुसिंचन तलाव यांच्या दुरुस्ती व पुनर्जिवित करण्यासाठी खर्च करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), सन २०१५-१६ अंतर्गत जलसंधारणाशी संबंधित असलेल्या सर्व जिल्हास्तरीय योजनांसाठी त्या योजनांच्या संबंधित लेखाशिर्षांखाली अर्थसंकल्पीत केलेल्या एकूण तरतूदीच्या ५०% इतकी तरतूद या पूर्वी निर्माण केलेले जुने बंधारे/ सिमेंट नालाबंडींग/ पाझर तलाव तसेच लघुसिंचन तलाव यांची दुरुस्ती व पुनर्जिवन करण्यासाठी खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी **तात्काळ** करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२२२१०२२४२९४१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kirankumar Vasantrao Wahul

Digitally signed by Kirankumar Vasantrao Wahul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kirankumar Vasantrao Wahul
Date: 2015.12.22 10:40:25 +05'30'

**( कि.व.वाहुल )**
शासनाचे उपसचिव.

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३) मा. मंत्री ( वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा /विधान परिषद
५) मा. मंत्री, राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
६) सन्माननीय विधानसभा / विधान परिषद सदस्य, संसद सदस्य. (सर्व).
७) मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८) प्रधान सचिव (नियोजन) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
९) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, (सर्व) मंत्रालय, मुंबई .
१०) आयुक्त (कृषी ), कृषी आयुक्तालय, पुणे,
११) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर
१३) महालेखापाल महाराष्ट्र- १ व २ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१६) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
१७) मंत्रालयीन प्रशासकिय विभाग, (सर्व)
१८) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)
१९) सदस्य सचिव, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद,
२०) सदस्य सचिव, विदर्भ विकास मंडळ, नागपूर,
२१) सदस्य सचिव, उर्वरीत महाराष्ट्र विकास मंडळ, पुणे,
२२) जिल्हाधिकारी, (सर्व)

२३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
२४) नियोजन विभागातील सहसचिव/ उपसचिव, (सर्व)
२५) संचालक, अर्थ सांख्यिकी संचालनालय,मुंबई.
२६) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)
२७) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, (सर्व)
२८) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई, (सर्व)
२९) निवड नस्ती, का. १४८१, नियोजन विभाग.

********